महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत, तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,मुंबई ४०० ०१९
email : managerpom@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र. मासंवि/रवका/न.क्र.०९/ No 15057

दिनांक: 26 MAY 2023

**प्रति,**
सह व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.वि.वि.कं.मर्या.
प्रादेशिक कार्यालय,
औरंगाबाद- ४३१००१.

**विषय - "औरंगाबाद" जिल्हयाचे नाव बदलून "छत्रपती संभाजी नगर" करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत "औरंगाबाद" या जिल्हयाच्या नावात बदल न करणेबाबत.**

**संदर्भ -** १) प्रशासकीय परिपत्रक क्र.६५६ दि.०६.०४.२०२३.
२) पत्र क्र.जा.क्र.२०२३/मशाका/प्राफेब/कावी-५१६ दि.०८.०५.२०२३.

उपरोक्त विषयांस अनुसरून महाराष्ट्र शासन, शासन राजपत्रांच्या धर्तीवर कंपनीमध्ये सर्व स्तरावर लेखी व तोंडी उपयोगात असलेल्या "औरंगाबाद" हा जिल्हा, तालुका व गाव याचे नाव ऐवजी "छत्रपती संभाजी नगर" असा बदल करण्याच्या सुचना कंपनीचे प्रशासकीय परिपत्रक क्र.६५६ दि.०६.०४.२०२३ अन्वये देण्यात आलेल्या आहेत.

२. आता, संदर्भीय पत्र क्र. ०२ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेश दि.२०.०४.२०२३ च्या याचिकेच्या अनुषंगाने "औरंगाबाद" जिल्हयाचे नाव बदलून "छत्रपती संभाजी नगर" करण्याबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका दाखल असून, नामांतराबाबत प्राप्त झालेल्या आक्षेपांची सुनावणी चालू असताना महसूल व इतर विभागाशी संबधीत कार्यालये "औरंगाबाद" जिल्हयाचे नाव बदलत असल्याची बाब याचिकाकर्ते यांचे विधीज्ञांनी मा. न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यावर मा. उच्च न्यायालयाचे पुढील आदेशापर्यंत महसूल व इतर विभागाशी संबंधीत कोणत्याही कार्यालयांनी "औरंगाबाद" नावात बदल न करणे बाबत जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी निर्देश दिले आहेत.

३. तरी, उपरोक्त प्रकरणी, सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या मंजूरी अन्वये कंपनीअंतर्गत सर्व स्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांनी सोबत जोडलेले, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद (महसुल शाखा) यांचे पत्र दि.०८.०५.२०२३ अन्वये "औरंगाबाद" जिल्हयाचे नाव बदलून "छत्रपती संभाजी नगर" करण्याबाबत, मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे पुढील आदेश निर्गमित होई पर्यंत "औरंगाबाद" नावात बदल न करण्याच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे व सदर सूचना आपल्या अखत्यारित सर्व संबंधित कार्यालयांना या संबंधीत आदेश देण्यात यावेत, ही विनंती.

**सोबत -** पत्र दि.०८.०५.२०२३.

(भूषण कुलकर्णी)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर :**
संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सविनय सादर :**

१) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय, कल्याण.

२) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

३) कार्यकारी संचालक (मासं) / (सुवअं)/ (वित्त)/ (देयके व महसूल) म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत सस्नेह रवाना :**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ मुख्य विधी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या., नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई-५१.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

५) मुख्य अभियंता, (देयके व महसूल), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

**प्रत रवाना :**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासंव्यप्र)/ (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.

३) मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या., सांघिक कार्यालय, मुंबई-५१.